www.majhisarkar.com
सायं. दैनिक
माझी सरकार
• संपादक : शेख फारुक हमीद • मो.9423309302




● बीड ▪ मंगळवार, दि. २६ नोव्हेंबर, २०२४ ▪ RNI : MAHMAR/2023/88578 ▪ majhisarkar2023@gmail.com ▪ वर्ष १ ▪ अंक ११० ▪ पाने ४ ▪ किंमत ३ रु.
● Beed ▪ Tuesday 26 November, 2024 ▪ RNI : MAHMAR/2023/88578 ▪ majhisarkar2023@gmail.com ▪ Year-1 ▪ Issue-110 ▪ Pages 4 ▪ Price 3

# बीडच्या विकासाला ब्रेक लागला : योगेश क्षीरसागर

## जनतेचा कौल मान्य करत पुन्हा एकदा कामाला लागलो

सरकार नेटवर्क

बीड विधानसभा मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार डॉ. योगेश क्षीरसागर यांचा निसटता पराभव झाला आहे. याबाबत भूमिका मांडण्यासाठी आज डॉ. योगेश क्षीरसागर यांनी पत्रकार परिषदेत आयोजित केली होती. ते म्हणाले की, मी वर्षभरापासून खूप विकासाचा मॉडेल आमच्याकडे तयार होता. परंतु अल्पशा मतांनी पराभव झाला.आपण बीड विधानसभा मतदारसंघातून महायुतीचा उमेदवार म्हणून पहिल्याच प्रयत्नात ९६ हजार ५५० मते मिळवली. विकासाच्या मुद्द्यावर मला मतदान करणाऱ्या सर्व मतदारांचे जाहीर आभार मानतो. अल्पशा मतांनी आपला पराभव झाला असून

**राज्यात महायुतीचे सरकार स्थापन होणार आहे. पण बीड विधानसभेत माझा पराभव झाल्याने विकासनिधी साठी हात आखडता राहू शकतो, या पराजयाने बीडच्या विकासाला ब्रेक लागला आहे. पक्षातील सर्वांनी खूप मेहनत घेतली, मतदारांनी भरभरून मतदान दिले पण निसटता पराभव झाला. आम्ही याचा अभ्यास करुन चुका सुधारु उमेदवार डॉ. योगेश क्षीरसागर यांनी सर्वांचे आभार मानले. ते पत्रकार परिषदेत बोलत होते. पक्षातील सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच युतीमधील पदाधिकाऱ्यांनी खूप मेहनत घेतली, प्रथमच उमेदवार म्हणून मी मतदारांच्या समोर होतो. तरीही मला भरभरुन मतदार करणाऱ्या मतदारांचे आभार मानले. येत्या काळात मी नियमित जनसेवेत तत्पर रहाणार असून, शहराचा पाणी प्रश्न सोडविणे यास माझं प्राधान्य राहिले असे सांगितले. यावेळी डॉ. सारिका क्षीरसागर याही उपस्थित होत्या.**

जनतेचा कौल मान्य करत पुन्हा एकदा कामाला लागलो आहे. माझ्यावर विश्वास टाकून मला महायुतीची उमेदवारी देणारे सर्व नेते, पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष मा.ना.अजितदादा पवार साहेब, राष्ट्रीय कार्याध्यक्ष मा.खा.प्रफुल्ल पटेल साहेब , प्रदेशाध्यक्ष मा.खा.सुनील तटकरे साहेब, राष्ट्रीय प्रवक्ते मा.ना.धनंजय मुंडे साहेब, मा.आ. पंकजाताई मुंडे, युवा नेते मा.पार्थदादा पवार यांचे मनापासून आभार मानतो. पुढे बोलताना ते म्हणाले जिल्ह्यात पाच विधानसभा मतदारसंघात युतीचे उमेदवार विजयी झाले. राज्यात सरकारही युतीचे स्थापन होणार पण आपला पराभव झाल्याने विकास निधीसाठी सरकार हात आखडता घेईल, यामुळे बीडच्या विकासाला ब्रेक लागला आहे. अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली आम्ही काम करीत आहोत, आम्ही सेक्युलर विचारसरणी सोडली नाही. परंतु गैरसमज निर्माण करण्यात आले. हे गैरसमज दूर करु, उमेदवार लवकर घोषित झाली असती आणि अण्णा सुरुवातीपासून सोबत असते तर चित्र वेगळे दिसले असते. येत्या काळात स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका होणार आहेत. त्यामुळे कोणत्याही कार्यकर्त्याला » पान २ वर



## जिल्हास्तरीय कराटे स्पर्धेत मिलियाचा बागवान उमर विभागीय स्पर्धेसाठी निवड

सरकार नेटवर्क

बीड - क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे यांच्या द्वारे संचालित जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय बीड तथा जिल्हा क्रीडा परिषद बीड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जिल्हा स्तरीय शालेय क्रीडा स्पर्धा २०२४-२५ अंतर्गत २३ ते २४ नोव्हेंबर, २०२४ रोजी छत्रपती शिवाजी महाराज क्रीडा संकुल, बीड येथे झालेल्या जिल्हा स्तरीय शालेय कराटे स्पर्धेत मिल्लिया माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा ( मुलांची ) बीड च्या १७ वर्ष मुले या गटात बागवान उमर अहेमद याने प्रथम क्रमांक पटकावला. त्याची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली. बीड जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर, जितेंद्र आरक, कराटे संघटनेचे सपाटे सर, बॉक्सिंग



कोच खराडे सर,मिल्लिया संस्थेचे सचिव खान सबिहा बाजी, डॉ.शेख समीर साहेब,मिल्लिया चे प्राचार्य सय्यद अब्दुल सत्तार, उप प्राचार्य सिद्दीकी अल्हाज, पर्यवेक्षक सय्यद मोईनोद्दीन यांनी बागवान उमर अहेमद आणि क्रीडा प्रमुख शेख मसरुर अन्वर यांचे अभिनंदन केले आणि विभागीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राज्यपालांकडे सोपवला राजीनामा

सरकार नेटवर्क

मुंबई : एकनाथ शिंदे यांनी राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांच्याकडे मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा सोपवला आहे. या वेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार हेही उपस्थित होते. या वेळी पुढील सरकारचा शपथविधी होईपर्यंत काळजीवाहू मुख्यमंत्री म्हणून काम पाहण्याची सूचना एकनाथ शिंदे यांनी राज्यपालांना केली आहे. महाराष्ट्र विधानसभेचा कार्यकाळ २६ नोव्हेंबर रोजी संपत आहे. त्यामुळे मुख्यमंत्र्यांनी राजीनामा दिला आहे. मुख्यमंत्र्यांचा राजीनामा हा संपूर्ण मंत्रीमंडळाचा राजीनामा असतो. त्यामुळे मुख्यमंत्री यांनी राजीनामा दिल्यानंतर सर्व मंत्रीमंडळाचा राजीनामा घटनेनुसार मानला जातो. महाराष्ट्र विधानसभा निवडणूक



निकाल जाहीर झाला आहे. महाराष्ट्रातील मतदारांनी भाजप, शिवसेना आणि राष्ट्रवादी यांच्या महायुतीला एकतर्फी बहुमत दिले आहे. महायुतीने २३६ जागांवर विजय मिळवला. विधानसभेच्या निकालानंतर आता मुख्यमंत्री कोण होणार, याची चर्चा रंगली आहे. याविषयी माध्यमांशी बोलतांना दीपक केसरकर यांनी तो निर्णय पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमित शाह घेणार आहे. महायुतीच्या तीनही नेत्यांना तो निर्णय मान्य आहे. उद्याच भाजपची बैठक असू शकते, त्यात निर्णय होऊ शकतो, असे माध्यमांशी बोलतांना सांगितले.

## शंकर जगताप यांचा सत्कार



सरकार नेटवर्क


बीड - पुण्यातील चिंचवड विधानसभा मतदार संघातून विजयी झालेले भाजपचे नवनियुक्त आमदार शंकर जगताप यांचा विशाल नगर येथे रविवारी सत्कार करण्यात आला. यावेळी भाजप नेते सचिन साठे, भारतीय खाद्य निगमचे सदस्य अनिल संचेती, सतीश गायकवाड, प्रभाकर न्यालकंटी , सचिन पवार, बाबुलाल बधाई , रोशन तातेड , संजय लबरू आदी उपस्थीत होते.

## अनाधिकृत होर्डिंग्ज मुळे शहराचे विद्रुपीकरण, वाहतुकीस अडथळा, अपघाताला निमंत्रण

### सीईओ अंधारे यांचे अभय, नगरपरिषद प्रशासन संचनालयाला तक्रार : ढवळे

सरकार नेटवर्क

बीड : बीड शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकातील अनाधिकृत होर्डिंग्ज मुळे शहराचे विद्रुपीकरण होत असुन विना परवाना बॅनर लावणाऱ्या विरोधात फौजदारी गुन्हे दाखल करण्याची तरतूद असतानाही राजकीय पुढाऱ्यांच्या निवडी,शहरात स्वागत, लोकप्रतिनिधी निवडून आल्याने शुभेच्छा देणाऱ्या अनाधिकृत होर्डिंग्जची संख्या दिवसेंदिवस वाढत असून सुंदर दिसणारा छत्रपती शिवाजी महाराज चौकाचे पर्यायाने शहराचे विद्रुपीकरण होत आहे.संबधित प्रकरणात लेखी तक्रार



देऊनही सीईओ नगरपरिषद नीता अंधारे जाणिवपूर्वक कारवाई करणे तर दुरच परंतु अनाधिकृत होर्डिंग्जला अधिकृत करण्याचा घाट नगरपरिषद करत असुन त्यांना बीडकरांच्या जीवाशी काही सोयरसुतक नसल्याचे दिसून येत असुन संबंधित प्रकरणात कारवाई करण्यात यावी यासाठी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबा गणेश कर यांनी नगरपरिषद प्रशासन संचनालय मुंबई यांना लेखी तक्रार केली आहे. मुंबईतील घाटकोपर येथील होर्डिंग्ज कोसळुन झालेल्या दुर्घटनेत १७ जणांचा मृत्यू झाला होता.त्याची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून उपायुक्त नगरपरिषद प्रशासन संचनालय मुंबई यांनी १७ मे २०२४ रोजी बीड नगरपरीषदेला त्यांच्या कार्यक्षेत्रामध्ये याबाबतच्या तातडीच्या उपाययोजना करण्यात येऊन विना परवाना होर्डिंग्ज, बॅनर,फलक लावण्यासाठी उभा करण्यात आलेला लोखंडी ढाचा व पोस्टर, बॅनर,फलक २४ तासांच्या आत काढुन घेण्यात यावा नसता मुदतीनंतर होर्डिंग्ज धारकां विरोधात रितसर फौजदारी गुन्हे दाखल करण्यात यावेत व होर्डिंग्ज लावण्यासाठी आलेला लोखंडी ढाचा व पोस्टर, फलक » पान २ वर

## मुख्यमंत्रिपदी फडणवीसच! दिल्लीत पक्षश्रेष्ठींकडून शिक्कामोर्तब

सरकार नेटवर्क

मुंबई : महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीमध्ये महायुतीने थेट २००चा टप्पा पार करत निर्विवाद बहुमत मिळविले. त्यानंतर मुख्यमंत्रिपदाची चर्चा सुरू झाल्यानंतर भाजपा तसेच शिवसेनेकडून दावे करण्यात येत आहेत. मात्र, ज्यांच्या जास्त जागा त्यांना मुख्यमंत्रीपद या सूत्राप्रमाणे भाजपाकडे असेल आणि त्यासाठी पक्षाचे ज्येष्ठ नेते देवेंद्र फडणवीस यांची निवड करण्यात आली असून दिल्लीत पक्षश्रेष्ठींकडून शिक्कामोर्तब झाल्याचे विश्वसनीय सूत्रांनी दिली.विधानसभा निवडणुकीतील विजयानंतर महायुतीतील एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेकडून मुख्यमंत्रिपदावर दावा करण्यात आला आहे.



यासाठी त्यांनी बिहार पॅटर्नचा दाखला दिला आहे. बिहारमध्ये जनता दल युनायटेडचे नेते नितीश कुमार आणि भाजपाने एकत्रितरित्या विधानसभा निवडणूक लढली होती. मात्र, जदयूला कमी जागा मिळाल्यानंतरही भाजपाने नितीश कुमार यांना मुख्यमंत्रिपद दिले होते. हाच बिहार पॅटर्न राज्यातही लागू करून एकनाथ शिंदे यांना पुन्हा मुख्यमंत्री करावे, अशी अपेक्षा शिवसेनेचे खासदार नरेश म्हस्के यांनी व्यक्त केली आहे. तथापि, मुख्यमंत्रिपदासाठी कोणाची निवड करायची, याचा निर्णय राजधानी दिल्लीत भाजपाचे पक्षश्रेष्ठी करणार आहेत. कारण, या निवडणुकीत भाजपाने १३२ जागांचा विक्रमी आकडा गाठला आहे. २०१४ मध्ये मोदी लाटेत भाजपाने १२२ जागा जिंकल्या होत्या. त्यानंतर २०१९मध्ये भाजपाचे १०५ जण निवडून आले हेते, पण यावेळी » पान २ वर

## मिल्लीया महाविद्यालयात संविधान दिन साजरा



सरकार नेटवर्क

बीड : येथील मिल्लीया कला, विज्ञान व व्यवस्थापनशास्त्र महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभाग व राज्यशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवार दिनांक २६ नोव्हेंबर २०२४ रोजी संविधान दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमास प्रमुख वक्त्या म्हणून प्राध्यापिका डॉ. शामल जाधव, अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोहम्मद इलयास फाजील तसेच उपप्राचार्य डॉ. सय्यद हनीफ, उपप्राचार्य प्रोफेसर हुसैनी एसएस, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रोफेसर मिर्झा असद बेग, डॉ. शेख रफिक, प्राध्यापिका डॉ. शेख एजाज परवीन, राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. खय्युम फारुकी, डॉ. शेख गफूर यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रोफेसर » पान २ वर

## मुंडे समर्थकांनी धस यांचा पुतळा जाळल्यामुळे 'आष्टी बंद'चा इशारा

### आरोपींना अटक करण्याची धस समर्थकांची मागणी पोलिसांना दिले निवेदन

सरकार नेटवर्क

आष्टी : विजयी झाल्यानंतर आमदार सुरेश धस यांनी आष्टीच्या विजयी सभेत भाजप नेत्या पंकजा मुंडे यांच्यावर टीकास्त्र सोडल्यानंतर आष्टी, शिरूर, पाटोदा तालुक्यात तीव्र पडसाद उमटू लागले आहेत. धस-मुंडे समर्थकांत नवा वाद उफाळला आहे. शिरूर तालुक्यातील सावरगाव चकला, राळेसांगवीत आमदार सुरेश धस यांचा प्रतीकात्मक पुतळा मुंडे समर्थकांनी जाळल्याची घटना घडली आहे. दोषींवर कठोर कारवाई करण्याच्या मागणीसाठी पाटोदा येथील धस समर्थकांनी पाटोदा पोलिसांना निवेदन दिले. तर, धस यांचा काही



समाजकंटकांनी अश्लील भाषेतील व्हिडिओ व्हायरल केल्याप्रकरणी आष्टी येथील धस समर्थकांनी थेट आष्टी पोलिस ठाण्यात धाव घेऊन २४ तासांत गुन्हा दाखल करून आरोपींना अटक करण्याची मागणी लावून धरत आष्टी बंदचा इशारा दिला आहे. आमदार सुरेश धस हे आष्टी येथील सभेत आमदार पंकजा मुंडे यांच्याविरोधात बोलल्यानंतर काही समाजकंटकांनी अश्लील भाषेत व्हिडिओ व्हायरल केल्याचा प्रकार समोर आला. या घटनेचा निषेध नोंदवत आष्टी येथील धस समर्थकांनी सोमवारी सकाळी भाजपचे आमदार सुरेश धस यांनी भाजप आमदार पंकजा मुंडे यांच्यावर आष्टीच्या विजयी सभेत टिका करत रोष व्यक्त केल्याने शिरूर तालुक्यातील राळेसांगवी येथील मुंडे समर्थकांनी निषेध व्यक्त करत आमदार सुरेश धस यांचा गावात प्रतिकात्मक पुतळा जाळून निषेध केला. शिरूर तालुक्यातील विधानसभा निवडणुकीतील प्रचारात माजी जिल्हा परिषद सदस्याची एक व्हिडीओ क्लिप सोशल व्हायरल झाली आहे. सदरील व्हिडीओ क्लिपमध्ये जिल्हा परिषद सदस्य पंकजाताई हाच आपला पक्ष आहे. भाजप पक्ष आपल्या बापाची जहागिरी नाही. यामुळे तालुक्यात पंकजाताईंचे हात बळकट करण्यासाठी अपक्ष उमेदवार भीमराव धोंडे यांनाच » पान २ वर

# तेव्हा कसोटी खेळणाऱ्याला प्रतिदिन ५० रु. मिळत आठवणी एका ज्येष्ठ कसोटीपटूच्या



चंदू पाटणकर हे १९५५ साली भारताचे यष्टिरक्षक म्हणून कलकत्त्याच्या ईडन गार्डन स्टेडियमवर न्यूझीलंड विरुद्धचा चौथा कसोटी सामना खेळले होते, त्या वेळी त्यांनी न्यूझीलंडच्या गॉर्डन लेगाट आणि बर्ट सटक्लिफ् या दोन्ही सलामीच्या फलंदाजांचे झेल यष्टीमागे लीलया पकडून त्यांना बाद केले होते. तसेच टोनी मॅकगिबन् या मातब्बर फलंदाजाला यष्टिचीत केले होते. त्याच सामन्यात ते भारतातर्फे आठव्या क्रमांकावर फलंदाजी करायला मैदानात उतरले होते तेव्हा भारताची धावसंख्या ७ बाद ८८ इतकी शोचनीय होती. अश्याही परिस्थितीत चंदू पाटणकर यांनी जे. एम. घोरपडे यांना उत्तम साथ देत अर्धशतकाची भागीदारी केली आणि स्वतः १३ धावा काढल्या. दुसऱ्या डावात फलंदाजी करत असताना त्यांनी अवघी एकच धाव काढलेली असताना भारताने डाव घोषित केल्याने ते नाबाद राहिले. दुसऱ्या डावात यष्टिरक्षक म्हणून खेळत असताना त्यांनी न्यूझीलंडचा फलंदाज जॅक अलबस्टर याचा यष्टीमागे झेल घेतला. एकंदरीत त्यांची कामगिरी समाधानकारकच झाली. मात्र तरीही चंदू पाटणकर यांच्या नावाचा विचार कसोटी सामन्यांसाठी पुढे कधी केला गेलाच नाही. नरेन ताम्हणे आणि नाना जोशी यांनाच भारताचे यष्टिरक्षक म्हणून पुढे अनेक वर्षे संधी मिळत गेली आणि चंदू पाटणकर यांची कसोटी कारकीर्द, कलकत्यातल्या त्या एकमेव कसोटी सामन्यानंतर समाप्तच झाली. प्रथम दर्जाच्या २६ सामन्यात त्यांनी ३८ फलंदाजांना यष्टीमागे क्षेत्ररक्षण करताना बाद केले होते आणि स्वतः फलंदाजी करत असताना पाचशेहून अधिक धावा रचल्या होत्या. चंदू पाटणकर यांची दृष्टी आणि स्मृती याही वयात उत्तम आहे. ते आजही दूरदर्शनवर क्रिकेटचे सामने पाहत असतात. क्रिकेटविषयक मराठी - इंग्रजी पुस्तके वाचत असतात. मी २००४ साली भारत - पाकिस्तान एकदिवसीय क्रिकेट सामने पाहण्यासाठी पाकिस्तानला गेलो होतो. त्यासंदर्भातील माझे पुस्तक दोनदा वाचल्याचे त्यांनी सांगितले. क्रिकेटपटू संदीप पाटील याने त्यांना भेट दिलेल्या 'बियॉण्ड द बाउंडरीज' या आत्मचरित्राची प्रत त्यांनी आम्हाला दाखवली. त्यांनी त्यांचे एक विशेष आवडते पेन मला दिले. हे पेन सुनील गावस्कर यांनी त्यांना सप्रेम भेट दिले होते. गप्पांच्या ओघात भारताच्या पहिल्या पाकिस्तान दौऱ्याचा विषय निघाला. हा दौरा डिसेंबर १९५४ ते मार्च १९५५ या दरम्यानचा होता. त्या दौऱ्यासाठी यष्टिरक्षक म्हणून भारतीय संघात आपली निवड होईल असा बहुधा त्यांचा कयास होता. परंतु भारताच्या संघात यष्टिरक्षक म्हणून नरेन्द्र ताम्हणे यांची प्रथमच निवड झाली. आपली ती संधी हुकली याची सल चंदू पाटणकर यांना आजही वाटत असल्यास नवल वाटायला नको. मात्र नरेन्द्र ताम्हणे यांच्याबद्दल त्यांच्या मनात तिळमात्र असूया किंवा मत्सर नाही. उलट अमाप जिव्हाळाच आहे. पाकिस्तानच्या त्या दौऱ्यात लाहोर, पेशावर किंवा बहावलपूर यांपैकी कुठल्यातरी एका शहरात भारतीय संघाच्या सगळ्या खेळाडूंना एकाच ठिकाणी एकत्रितपणे राहणे शक्य होईल असे एकही दर्जेदार हॉटेल नसल्याने त्यांची राहण्याची सोय चक्क तिथल्या रेल्वेस्थानकातल्या लोहमार्गावर रेल्वेचे दोन खास डबे एकाच जागी उभे करून त्यांमध्ये करण्यात आली होती, असेही त्यांनी सांगितले. त्याकाळी पाच दिवसांच्या कसोटी सामन्यात संघातल्या प्रत्येक खेळाडूला प्रतिदिनी ५० रुपये दिले जात असत. सामना चारच दिवसांत संपला तर पाचव्या दिवसाचे पैसे मिळत नसत. १९५५ साली ते जो एकमेव एक कसोटी सामना खेळले, तेव्हा पॉली उम्रीगर हे त्या संघाचे कर्णधार होते. विनू मंकड आणि नरी कॉन्ट्रॅक्टर हे सलामीचे फलंदाज होते. पंकज रॉय तिसऱ्या क्रमांकाचे फलंदाज होते. विजय मांजरेकर, पॉली उम्रीगर, गुलाबराय रामचंद आणि जयसिंगराव घोरपडे हे मधल्या फळीचे फलंदाज होते तर दत्तू फडकर आणि जी. सुंदरम् हे द्रुतगती गोलंदाज म्हणून आणि सुभाष गुप्ते हे फिरकी गोलंदाजीचे जादूगार म्हणून या संघात होते. अशा संघात यष्टिरक्षक म्हणून खेळण्याची संधी चंदू पाटणकर यांना मिळाली होती. असो.

चंदू पाटणकर यांचा जन्म पेण येथे २४ नोव्हेंबर १९३० रोजी झाला होता. त्यांचे वडील डॉक्टर होते. वैद्यकीय व्यवसायासाठी ते पुण्याला आले. त्यांनी डेक्कन जिमखान्यालगतच्या पी. वाय. सी. हिंदू जिमखान्यासमोरच घर घेतले आणि तिथेच आपला दवाखाना सुरू केला. साहजिकच त्याच भागात राहत असलेले क्रिकेट महर्षी प्रा. दि. ब. देवधर यांचे त्या दवाखान्यात अधूनमधून येणे - जाणे होऊ लागले आणि चंदू पाटणकर यांचे वडील हे प्रा. देवधर यांचे मित्र आणि फॅमिली डॉक्टर झाले. प्रा. देवधर हे एस. पी. कॉलेजमध्ये प्राध्यापक होते. कॉलेज संपल्यावर संध्याकाळच्या वेळी ते धोतर नेसून मात्र पायांना पॅड बांधून जिमखान्याच्या मैदानावर क्रिकेटचा सराव करत असत. त्यामुळे चंदू पाटणकर यांना त्यांच्या बालपणीच प्रा. देवधर यांची फलंदाजी अगदी सहजपणे आणि जवळून बघता आली. पुण्यातल्या सुप्रसिद्ध मॉडर्न हायस्कूलमध्ये शिकत असताना ते शाळेच्या क्रिकेट संघाचे कॅप्टन होते. शालेय शिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यांनी पुण्यातल्याच फर्ग्युसन कॉलेजमध्ये विज्ञान शाखेत प्रवेश घेतला मात्र वर्षभरानंतर ते मुंबईला आपल्या थोरल्या बहिणीकडे हिंदू कॉलनीत राहायला आले. त्याच इमारतीत क्रिकेटपटू माधव मंत्री राहत होते. चंदू पाटणकर यांची बहीण रुईया कॉलेजमध्ये वनस्पती शास्त्राची प्राध्यापक होती आणि मेव्हणे त्याच कॉलेजमध्ये पदार्थविज्ञान विषयाचे प्राध्यापक होते. याच कारणास्तव चंदू पाटणकर यांनी रुईया कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. त्यांना कॉलेजच्या क्रिकेट संघातून खेळायची संधी मिळत गेली. त्यांना मुंबई विद्यापीठाच्या संघात यष्टिरक्षक म्हणून घेण्यात आले. इंटर - युनिव्हर्सिटी सामन्यांमधली त्यांची कामगिरी पाहून त्यांना मुंबईतर्फे रणजी सामन्यात खेळायची संधी आपोआपच मिळाली. १९५३ पासूनच्या पुढील दहा वर्षात ते दहा रणजी सामने खेळले. त्यातले अखेरचे एक - दोन सामने ते केवळ त्यांचे मित्र चंदू बोर्डे यांच्या आग्रहास्तव, महाराष्ट्र संघाकडून खेळले. चंदू बोर्डे हे त्या काळी महाराष्ट्र संघाचे नेतृत्त्व करत असत. चंदू पाटणकर यांनी १९५४ साली आपले पदव्युत्तर शिक्षण पूर्ण होताच मुंबईतल्या बी. ई. एस. टी. मध्ये तिकीट तपासनीसाची नोकरी स्वीकारली आणि १३ वर्षे ती इमाने इतबारे केली. त्यादरम्यान ते 'टाईम्स शील्ड' साठीचे सामने खेळले. प्रसिद्ध क्रिकेटपटू आणि यशस्वी उद्योजक माधव आपटे यांनी सोलापूर येथील लक्ष्मी विष्णु कॉटन मिल विकत घेतल्यानंतर चंदू पाटणकर यांना १९७० साली त्याच मिलमध्ये जनसंपर्क अधिकारी या पदावरची नोकरी दिली. ही नोकरी करत असताना त्यांनी सामग्री व्यवस्थापनशास्त्र ( मटेरियल्स मॅनेजमेंट ) या विषयाचा अभ्यास केला आणि पुढे त्याच विषयात पुणे विद्यापीठाची 'डॉक्टरेट' मिळवली. एम. एस्सी. केल्यानंतर तब्बल ३० वर्षांनी त्यांनी ही उपाधी प्राप्त केली होती. ही उपाधी प्राप्त करणारे ते एकमेव भारतीय कसोटीवीर आहेत. क्रिकेट क्लब ऑफ इंडियाचे तत्कालीन अध्यक्ष राज सिंह डुंगरपूर यांनी सी. सी. आय. च्या सचिवपदी त्यांची नियुक्ती केली त्यामुळे ते उर्वरित काळात क्रिकेट या खेळाशी आणि क्रिकेट खेळाडूंशी कायम निगडित राहिले. त्याशिवाय सेवानिवृत्तीनंतर तहहयात मिळणाऱ्या निवृत्तीवेतनासाठी देखील ते पात्र ठरले. आज त्यांच्या वृद्धापकाळात त्यांना मिळत असलेले घसघशीत रकमेचे निवृत्तीवेतन त्यांच्यासाठी जणू वरदानच ठरले आहे. बी. सी. सी. आय. ने एके वर्षी त्यांच्यासाठी 'बेनेफिट मॅच' घ्यायचे ठरवून त्यांना दहा लाख रुपयांची थैली देण्याचे उद्दिष्ट ठेवले होते, परंतु नेमके त्याच सुमारास दक्षिण आफ्रिकेचा कर्णधार हॅन्सी क्रोनिए याचे मॅच फिक्सिंग उघडकीस आले आणि क्रिकेट विश्वाला जबरदस्त हादरा बसला. परिणामतः चंदू पाटणकर यांच्यासाठी आयोजित केलेला मदत - सामना रद्द करण्यात आला. त्याऐवजी बी. सी. सी. आय. ने चंदू पाटणकर यांना आधी ठरवलेल्या रक्कमेच्या दामदुप्पट रक्कम देऊन त्यांचा सन्मान केला.

## पान १ आणि ४ वरुन...

## पान १ आणि ४ वरुन...

### बीडच्या विकासाला ब्रेक...

वाऱ्यावर सोडणार नसून त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहील. जुने-नवे कार्यकर्ते मिळून एक दिलाने काम करू. झालेल्या चुका टाळून आगामी निवडणुकांमध्ये यश प्राप्त करण्यासाठी प्रयत्नशील आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे विचार तळागळापर्यंत पोहोचण्यासाठी आपण कटिबद्ध आहे, असे स्पष्ट केले.पक्षातील सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच युतीमधील पदाधिकाऱ्यांनी खूप मेहनत घेतली, प्रथमच उमेदवार म्हणून मी मतदारांच्या समोर होतो. तरीही मला भरभरुन मतदार करणाऱ्या मतदारांचे आभार मानतो असे ते म्हणाले.यावेळी डॉ. सारिका क्षीरसागर याही उपस्थित होत्या.

### मुंडे समर्थकांनी धस...

मतदान करा, निवडून आल्यावर त्यांना आपण ताईकडे घेऊन जावू आणि ताईसमोर उभे करू, असे आवाहन मतदारांना करताना प्रचारादरम्यानची व्हिडिओ क्लिप सध्या सोशल मिडीयावर व्हायरल झाली आहे. दुसरीकडे पाटोदा येथे सोमवारी धस समर्थकांनी एकत्र येत पाटोदा पोलिस व उपविभागीय निवेदन दिले. सावरगाव चकला येथे १२ व्यक्तींनी एकत्र येऊन आमदार धस यांचा प्रतीकात्मक पुतळा जाळत अर्वाच्य भाषेत बदनामीकारक वक्तव्य केले आहे. दोन समाजात तेढ निर्माण करण्याचा हा प्रयत्न करणाऱ्या दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी जब्बार पठाण, पद्माकर घुमरे, सय्यद शहानवाज, सोमीनाथ कोल्हे, प्रकाश जावळे, रामेश्वर जाधव, रोहिदास गिते, महादेव जाधव, दत्तात्रय साठे यांनी केली. आष्टी येथील पोलिस ठाण्यात धाव घेऊन २४ तासांच्या आत आरोपींवर गुन्हे दाखल करून अटकेची मागणी केली. अन्यथा आष्टी शहरात बंद पाळला जाणार असल्याचा इशारा दिला आहे. या वेळी समर्थकांनी सुरेश धस जिंदाबादच्या घोषणाही दिल्या. आमदार धस यांच्या भाषणाचा राजकीय द्वेषापोटी विपर्यास केला जात असल्याचा आरोपही आष्टीतील समर्थकांनी केला आहे.

### अनाधिकृत होर्डिंग्ज मुळे ...

काढुन घेऊन त्यासाठी लागणारा खर्च रितसर वसुल करण्यात यावा असे आदेश दिले होते. त्याअनुषंगाने बीड शहरातील ७१ अनाधिकृत होर्डिंग्ज हटवण्यासाठी नगर पालिकेने संबंधित ५ लोकांना पत्र दिले होते. यात २४ तासांची मुदत देत फौजदारी गुन्हे दाखल करण्याचा ईशाराही दिला होता मात्र सीईओ नीता अंधारे यांनी कारवाई करण्याऐवजी अनाधिकृत होर्डिंग्जला अधिकृत करण्याचा घाट घालत त्यांची पाठराखण केल्याचे दिसून आले. बीड शहरातील अनाधिकृत होर्डिंग्ज प्रकरणी कारवाई न करताच स्ट्रक्चर ऑडिटच्या नावाखाली होर्डिंगला वय ठरवून अनेक वर्षापासून नगरपालिकेचा कर चुकावणाऱ्या होर्डिंग धारकांची पाठ राखण करत उपायुक्त नगरपरिषद प्रशासन संचनालय मुंबई यांच्या आदेशाची अवमान ना करणाऱ्या मुख्याधिकारी नगर परिषद बीड येथे अंधारे यांच्यावर प्रशासकीय कारवाई करण्यात यावी अशी मागणी डॉ. गणेश ढवळे यांनी लेखी निवेदनाद्वारे केल्यानंतर सुवर्णा ओगले -शिंदे सहा.आयुक्त(गट -अ) नगरपरिषद प्रशासन संचनालय मुंबई यांनी सह आयुक्त/ उपायुक्त नगरपरिषद प्रशासन शाखा विभागीय आयुक्त कार्यालय छत्रपती संभाजीनगर यांना तक्रारीच्या अनुषंगाने सदर प्रकरणाची आपल्या स्तरावरून शहानिशा करून उचित कार्यवाही करावी व अर्जदारास लक्ष्यवेधी आंदोलनापासून परावृत्त करावे.तसेच केलेल्या कार्यवाहीची एक प्रत संचालनालयास तात्काळ सादर करावी असे नमुद केले होते.मात्र या घटनेला ६ महिने उलटूनही अद्याप कोणतीही कारवाई करण्यात आली नाही. त्यामुळे संबंधित प्रकरणात जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी डॉ.गणेश ढवळे यांनी केली आहे.

### मिल्लीया महाविद्यालयात...

मिर्झा असद बेग यांनी केले. त्यांनी सांगितले की भारतीय संविधानाचा अमृत महोत्सव साजरा करण्यात येत असून, प्रत्येक भारतीय नागरिकात संविधान घटना, प्रास्ताविका यातील उच्च तत्वे, मूल्ये याबद्दल माहिती व्हावी.प्रमुख वक्त्या डॉ. शामल जाधव यांनी भारतीय संविधान हे सर्वश्रेष्ठ असून, त्यातून भारतीय जीवनशैली, स्वतंत्र, समता, बंधुता व सर्वधर्म समभावाची शिकवण मिळते तसेच संविधानाने आपल्याला अनेक हक्क दिले आहेत, त्यामुळे आपण संपूर्ण स्वातंत्र्य आणि समानतेने जीवन जगतो. भारतीय राज्यघटनेबाबत जागरूकता वाढवणे, घटनात्मक अधिकार व कर्तव्या बद्दल विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता वाढवने आवश्यक आहे असे सांगितले. तसेच संविधान उद्देशिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोहम्मद इलयास फाजील यांनी संविधानातील डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान, भारतीय संविधानातील मूल्य, त्यांचे अर्थ, प्रत्येक भारतीयाची मूलभूत कर्तव्य याबद्दल मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे आभार डॉ. शेख गफूर यांनी व्यक्त केले. कार्यक्रमास सर्व प्राध्यापक वृंद, कर्मचारी वृंद व राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक विद्यार्थी-विद्यार्थिनी यांची उपस्थिती होती.

### मुख्यमंत्रिपदी फडणवीसच!...

भाजपाने १३२ जागा जिंकत मोदी लाटेचा रेकॉर्डही मोडला आहे. हे सारे यश देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीमुळेच मिळाल्याने ते मुख्यमंत्रिपदाचे दावेदार ठरतात, असे भाजपा नेत्यांचे म्हणणे आहे. पक्षाकडून मुख्यमंत्रीपदाची घोषणा होण्यास विलंब होत असल्याने फडणवीस समर्थकांमध्ये अस्वस्थता आहे. अशातच भाजपाच्या नवनिर्वाचित आमदारांसह भाजपाला पाठिंबा देणार्या अपक्ष आमदारांनी फडणवीस यांच्या नावाचा आग्रह धरला आहे.

### महायुतीच्या अभूतपूर्व ...

ठाकरे आणि धर्मवीर आनंद दिघे साहेब यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून फाटक्यांची आतषबाजी करत शिवसेनेचा जयघोष केला तसेच सर्वांनी मिठाई वाटून आनंदत्सव साजरा केला. मा.मुख्यमंत्र्यांच्या लाडक्या बहिणी, लाडके भाऊ, लाडके शेतकरी, ज्येष्ठ नागरिक, कार्यकर्ते व लाडके शिवसैनिक यांच्या कष्टातून विधानसभा निवडणुकीत आपणांस भरघोस यश मिळाले असल्याच्या भावना याप्रसंगी व्यक्त करण्यात आल्या. या निमित्ताने सायंकाळच्या दरम्यान शिवसैनिक तथा महिला भगिनींनी पणती व दिवे प्रज्वलीत केले तसेच विविध

मंदिरात देखील शिवसैनिकांनी देवी देवतांच्या चरणी नतमस्तक होऊन आरत्या केल्या व शिवसेना मुख्य नेते मा. एकनाथजी शिंदे साहेब यांची महाराष्ट्र राज्याच्या मुख्यमंत्री पदावर वर्णी लागावी यासाठी प्रार्थना केली. याप्रसंगी कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती शाम भाऊ पडूळे, शिवसेना जेष्ठ नेते सुरेश तात्या शेटे, महिला आघाडी जिल्हा सहसंपर्कप्रमुख डावकर ताई, शिवसेना जिल्हा संघटक सुनील सुरवसे, शिवसेना जिल्हा संघटक योगेश नवले, शिवसेना उपजिल्हाप्रमुख अजय जाधव, शिवसेना विधानसभा प्रमुख सुनील अनभुले, शिवसेना तालुका संघटक गणेश मस्के, सुदर्शनजी धांडे, सुनील गवते, गजानन कदम, शिवसेना शहर संघटक नवनाथ शिंदे, शिवसेना शहर सह संघटक ऋषिकेश जोगदंड, शिवसेना उप शहर प्रमुख हनुमानप्रसाद पांडे, शिवसेना उपशहर प्रमुख अक्षय काशीद, माजी सरपंच संदीपान बडगे, शिवसेना विभाग प्रमुख सदाशिव सुर्वे , शिवसेना विभाग प्रमुख शहर रणजीत बुंदिले, सरपंच अंकुश गायकवाड,अमोल मामा जाधव, उत्कर्ष धपाटे, गणेश काळे, अनिल खांडे, अविनाश पाटोळे,तुकाराम गोरे, गणेश डांगे, राहुल कोकाटे, अजय सुरवसे, प्रताप जगताप, गणेश काळे व आदी उपस्थित होते.

### आ.गोपीचंद पडळकर...

मतदारसंघात मोठा जनसंपर्क असल्यामुळे त्यांना मानणारा वर्ग आहे. आ.गोपीचंद पडळकर साहेब निवडणुकीसाठीत त्यांनी जीवाचे रान केले. बिडगर यांनी मतदारसंघ रात्रण दिवस प्रचारात आघाडी घेत पूर्ण मतदारसंघ पिजून काढल्यामुळे आ.पडळकर साहेब यांना बळ मिळाले आहे. शिवदास बिडगर यांच्यामुळे मोठ्या मताधिक्याने आ. पडळकर साहेब यांचा विजय झाला आहे. जत विधानसभा मतदारसंघातून आ.गोपीचंद पडळकर हे निवडणूक लढवली. आ. गोपीचंद पडळकर यांच्या प्रचारार्थ पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ शासकीय स्मारक समिती सदस्य तथा धनगर समाजाचे महाराष्ट्राचे युवा नेते शिवदास बिडगर यांनी संपूर्ण मतदारसंघ पिंजून काढला असून गावोगावी आ. पडळकर साहेब यांना मतदारांचा वाढता पाठिंबा विज्यासाठी केलेल्या आवाहन केले. त्यांनी आपल्या प्रचाराचा धडाका लावला आहे. मतदारसंघातील प्रत्येक गावात जाऊन मतदारांच्या ते वैयक्तिक गाठीभेटी घेत आहेत. जत तालुक्यातील व मतदारसंघत प्रत्येक ठिकाणी मतदारांचा त्यांना मिळालेला प्रचंड प्रतिसाद व त्यांनी जनतेला केलेल्या विजयाच्या आवाहनामुळे आ. गोपीचंद पडळकर यांचा मोठ्या मताधिक्याने विजयी झाले. या निवडणूकीत शिवदास बिडगर यांचा मोलाचा वाटा आहे.

### स्थानिक शेतकऱ्यांनी एल.टी...

माझ्या समवेत उपस्थित पाटोदा तालुका अध्यक्ष बापू जावळे, अनिल शेलार, सुमित शेलार, चेतन उबाळे, सुंदर वाघमारे व पाटोदा तालुक्यातील ऑल इंडिया पँथर सेनेचे सर्व कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते.

### ब्रम्हनाथ येळंब १३३...

दाबामुळे कृषिपंप चालत नसल्याने पीकांना पाणी देणे शक्य होत नव्हते. या संदर्भात नागरीकांकडून उपकेंद्राची क्षमता वाढविण्याची मागणी करण्यात येत होते. याचा विचार करता प्रशासनाने ब्रम्हनाथ येळंब उपकेंद्रात १० हजार केव्हीए क्षमतेचे रोहित्र बसविण्यात येणार आहे. सदरील रोहित्र उपकेंद्रात दाखल झाले असून बसविण्याचे काम केले जाणार आहे. या रोहित्रामुळे शिरूर तालुक्यात विजेचा प्रश्न मार्गी लागणार असल्याने नागरीकांकडून समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

### केजच्या बाजारात ७१००...

कृषी उत्पन्न बाजार समितीने शहरातील केशव जिनिंग, माऊली जिनिंग, व्यंकटेश जिनिंग या तीन जिनिंगला शासकीय हमी भावाने कापूस खरेदीस परवानगी दिली आहे. दिवाळीच्या पाडव्याला व पाडाव्यानंतर कापूस जिनिंगने कापूस खरेदी केंद्राचा शुभारंभ करीत कापूस खरेदी सुरू केली होती. २४ नोव्हेंबरपर्यंत माऊली जिनिंगवर सर्वाधिक ५ हजार ७५ क्विंटल, केशव जिनिगवर ४ हजार ८४ क्विंटल तर व्यंकटेश जिनिगवर १ हजार ५८० क्विंटल अशी एकूण १० हजार ७३९ क्विंटल कापूस खरेदी झाली आहे. तर हा खरेदी करण्यात आलेला कापूस प्रति क्विंटल ७ हजार १०० रुपयांपर्यंत भावाने खरेदी करण्यात आला आहे. अशी माहिती कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव संतोष देशमुख यांनी दिली.

### क्रिकेटसह कराटे स्पर्धेत...

चौरे आणि दिनेश ढाकणे यांचे मोठे योगदान आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी ही उंची गाठली आहे. यशस्वी ट्विंकलिंग स्टार स्कूलचे संचालक गणेश मैड, शीतल मैड, कोमथ प्राचार्या, उपप्राचार्य आणि शिक्षकांनी अभिनंदन केले आहे.

### राजमाता जिजाऊ महाविद्यालयामध्ये ...

प्रभारी कार्यालय अधीक्षक श्री. केशव भोंडवे, सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. विनायक कापावार राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. विजयकुमार कुंभारे, कार्यक्रमाधिकारी प्रा. बालासाहेब जोगदंड, कार्यक्रमाधिकारी डॉ. डी. बी. जाधव, प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी, राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक व विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## एका विजयाने कोणी मोठा होत नाही आणि एका पराभवाने कोणीही संपत नाही

# पक्षाचे काम जोमाने करणार; पवार साहेबांचा विचार तळागाळातील जनतेपर्यंत पोचवणार : राजेभाऊ फड



सरकार नेटवर्क

परळी वैजनाथ : परळी वैजनाथ विधानसभा मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची ताकद वाढवण्यासाठी जोमाने काम करणार असून देशाचे नेते शरदचंद्र पवार साहेबांच्या विचारांना तळागाळातील लोकांपर्यंत पोहचवण्यासाठी ज्येष्ठांना आणि युवकांना सोबत घेऊन नव्याने संघटना वाढीसाठी रचनात्मक काम करण्यावर आम्ही भर देणार असल्याचे युवक नेते राजेभाऊ फड यांनी म्हटले आहे. पक्षाच्या बाजूने लढणाऱ्या प्रत्येक कार्यकर्त्यांसोबत हातात हात घालून काम करू तसेच पक्षाला कौल देणाऱ्या मतदारांच्या समस्या सोडवण्यासाठी संघर्ष करीत राहणार असल्याचेही त्यांनी म्हटले आहे. परळी वैजनाथ विधानसभा मतदारसंघ हा राज्यातील सर्वाधिक लक्षवेधी असलेला मतदारसंघ आहे. येथील जनता शरदचंद्र पवार साहेबांच्या नेहमीच पाठीशी उभी टाकलेली आहे आणि त्यांच्या विचारांना मानणारा वर्ग मोठ्या प्रमाणावर आहे. एका विजयाने कोणी मोठा होत नाही आणि एका पराभवाने कोणीही संपत नाही. विधानसभा निवडणुकीतील निकाल हा जरी धक्कादायक असला तरीही या निकालाचे अजिबात आश्चर्य नाही. लोकशाहीला काळीमा फासणाऱ्या अनेक घटना मतदानाच्या दिवशी घडल्या. बोगसगिरीचे प्रकार मोठ्या प्रमाणावर घडले आहेत. त्यामुळे हा जनतेचा कौल आहे असं कसं म्हणता येईल? हा तर फक्त ईव्हीएमचा कौल आहे. पक्षाचे अध्यक्ष आणि देशाचे नेते शरदचंद्र पवार साहेबांच्या मार्गदर्शनाखाली आगामी काळात आम्ही वाटचाल करणार असून नव्या जोमाने आम्ही काम करू, पक्ष संघटना मजबूत करण्यासाठी रचनात्मक आखणी करू आणि ज्येष्ठांना व युवकांना सोबत घेऊन पक्षाचा विस्तार करू अशी प्रतिक्रिया युवक नेते राजेभाऊ फड यांनी माध्यमांना दिली आहे.

# ऊस वाहतूक करणाऱ्या बैलगाड्या व वाहनांना रेडियम, रिफ्लेक्टर लावा

## पुरोगामी पत्रकार संघ निवेदनाद्वारे केली केज तहसिलदार यांच्याकडे मागणी

सरकार नेटवर्क



बीड : केज तालुक्यात दोन साखर कारखाने आहेत. दोन्ही कारखाने सुरु झाले आहेत, ऊस उत्पादक शेतकर्यांसाठी आनंदाची गोष्ट आहे. पण रात्रीच्या वेळी ऊस वाहतूक करणार्या बहुतांश वाहनांच्यापाठीमागे रेडियम अथवा रिफ्लेक्टर लावलेले दिसून येत नाही. त्यामुळे अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यासाठी कारखाना संचालक यांनी याची सक्ती करुन होणारे अपघात टाळावेत. दिवसेंदिवस रोडवरील अपघातांची संख्या वाढत आहे. वाढती अपघाताची संख्या कमी करण्यासाठी वाहतूक नियमांची जनजागृती तसेच त्यावर विविध उपाययोजना होणे गरजेचे आहे. सद्या साखर कारखाने सुरु झाले आहेत. रात्रीच्या वेळी ऊस वाहतूक करणार्या वाहनांमुळे अनेक अपघात झालेली आहेत. या अपघातामध्ये अनेक निष्पाप बळी गेलेले आहेत. त्यामुळे साखर कारखानदार यांनी कारखान्यावर येणाऱ्या प्रत्येक ऊस वाहतूक वाहनांच्या मागे रेडियम, रिफ्लेक्टर लावणे सक्तीचे करावे. तसेच वाहतूक विभागाकडून वाहतूक नियमांचे पालन न करणाऱ्या ऊस वाहतूक वाहनांवर कडक कार्यवाही होणे गरजेचे आहे. तसेच ऊस वाहतूक करणार्या वाहन चालकाने वाहतूकीच्या नियमाचे काटेकोटरपणे पालन करुन वाहनांना रेडियम, रिफ्लेक्टर लावण्याबाबत वाहन चालक व मालक यांना सुचना देण्यात याव्यात अशी मागणी पुरोगामी पत्रकार संघ केज यांनी आज तहसील कार्यालय येथे निवेदन देऊन करण्यात आली आहे. यावेळी पुरोगामी पत्रकार संघाचे बीड जिल्हा अध्यक्ष दत्तात्रय मुजमुले, केज तालुका अध्यक्ष रणजित घाडगे, केज तालुका सचिव दिनकर जाधव, पत्रकार जयद्रथ गायकवाड यांची उपस्थिती होती.

# मुंडेंच्या जिल्ह्यात लक्ष्मण हाकेंच्या शब्दालाही मान

सरकार नेटवर्क

बीड : ओबीसीमध्ये हुंकार जागवून त्यांना हक्क मिळवून देण्यात दिवंगत लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांचा सिंहाचा वाटा. पुढे पंकजा मुंडे यांची समाजावर घट्ट पकड राहीली. धनंजय मुंडे यांनीही समाजात चांगले वलय निर्माण केले. मात्र, या निवडणुकीत या मुंडे भावंडांचा शब्द डावलून समाजातील काही नेत्यांनी लक्ष्मण हाकेंचा 'शब्द प्रमाण' मानला आणि समाजानेही या नेत्यांना मतदानात लक्षणीय साथ दिली हे विशेष.

भीमराव धोंडे यांनी ६० हजार मतांचा पल्ला पार केला. तर, माधव निर्मळ आणि प्रियंका खेडकर यांनी ३० हजारांचा पल्ला पार केला आहे. लोकसभा निवडणुकीतील 'मराठा-ओबीसी' समिकरणाची याला झालर राहीली. २०१२ साली दिवंगत मुंडे यांच्यापासून धनंजय मुंडे दुरावल्यानंतर त्यांना ओबीसी समाजाच्या विरोधाचा काही वर्षे तिव्र सामना करावा लागला. मुंडेंच्या निधनानंतर पंकजा मुंडे यांच्या मागे ताकदीने उभारणारा ओबीसी समाज मुंडे सांगतील त्या उमेदवाराच्या मागेही मोठ्या संख्येने असे. मागच्या लोकसभा निवडणुकीत जिल्ह्यात 'मराठा-ओबीसी' दरी



पहायला मिळाली. त्यामुळे विधानसभेला ओबीसीची हाक देण्यात आली. ओबीसी आरक्षण आंदोलक लक्ष्मण हाके यांनीही या हाकेला बळ दिले. दरम्यान, निवडणुकीत आष्टीतून भीमराव धोंडे, माजलगावमधून माधव निर्मळ व बाबरी मुंडे, गेवराईतून प्रियंका खेडकर आदींनी अर्ज दाखल केले. बहुतेकांनी दिवंगत मुंडे, पंकजा मुंडे, लक्ष्मण हाके, नवनाथ वाघमारे यांच्यासह काहींनी धनंजय मुंडे यांचेही फोटो प्रचारात वापरले. या उमेदवारांना आमचे कसलेही समर्थन नाही, आम्ही महायुतीचे काम करत आहोत, महायुतीच्या उमेदवारांना मते देण्याचे आवाहन धनंजय मुंडे व पंकजा मुंडे यांनी माजलगाव, गेवराई व आष्टी मतदार संघातील सभांमधून केले. तर, दुसरीकडे लक्ष्मण हाके यांनी यातील काही उमेदवारांसाठी सभा आणि मतदार संघाचे दौरे करुन मतदानाचे आसवाहन केले. प्रियंका खेडकरांसाठीच्या सभांना मोठी गर्दीही होत होती. एकिकडे मुंडे भावंडे महायुतीच्या उमेदवारांना मतदान मागत होते. तर दुसरीकडे हाके या उमेदवारांसाठी सभा घेऊन मतदान करण्याचे आवाहन करत होते. महायुतीला जिल्ह्यात घवघवीत यशही मिळाले. परंतु, हाकेंचा शब्दही खाली गेला नाही. भीमराव धोंडे यांनी ६२ हजार ५३२, माधव निर्मळ यांनी ३४,७६७ तर वंचितकडून असलेल्या प्रियंका खेडकर यांनी ३१,२२३ मते मिळविली. ज्या बाबरी मुंडे यांच्या उमेदवारीबाबत पंकजा मुंडे यांनी सोशल मिडीयावर व्हिडीओच्या माध्यमातून भूमिका स्पष्ट केली. त्या मुंडेंनीही १८ हजार मतांचा पल्ला पार केला. यावरुन जिल्ह्यातील ओबीसी समाजात आता हाकेंच्या शब्दालाही मान असल्याचे स्पष्ट झाले आहे. मात्र, मते घेताना बहुतेकांना मुंडेंचे फोटो व नाव वापरावे लागले हेही विशेष.

# अवैद्यरीत्या मद्य विक्री नेकनूर पोलिसांची हॉटेलवर छापा

सरकार नेटवर्क

लिंबागणेश - नेकनूर पोलीस स्टेशन हद्दीत अवैधरित्या हॉटेलमध्ये देशीविदेशी दारू विक्री होत आहे. ही माहिती मिळताच नेकनूर पोलिसांनी छापा मारत हा देशी विदेशी दारूचा साठा जप्त करत चौघांविरोधात गुन्हा दाखल केला. ही कारवाई शुक्रवार दि. २२ नोव्हेंबर रोजी करण्यात आली. यात आरोपी (१)सौरभ सगळे रा. अंजनवती(२)शुभम दराडे रा. मांजरसुंबा (३)संजय जगताप रा. अंधापुरी (४)नारायण मुंढे रा. हिंगणी (खुर्द) यांच्यावर कारवाई करण्यात आली. नेकनुर पोलीस ठाणे हद्दीत अवैध रित्या देशी विदेशी दारूची विक्री करत असल्याची माहिती गुप्त बातमीदारा मार्फत




मिळताच नेकनूर पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक चंद्रकांत गोसावी यांच्या मार्गदर्शनाखाली छापा टाकण्याचे नियोजन ठरले. छापा मारला असता या ठिकाणी अवैध रित्या देशी विदेशी दारु आढळून आली. पोलिसांनी त्या कारवाईत जवळपास १०९५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. याप्रकरणी चौघांविरोधात नेकनूर पोलिस ठाण्यात महाराष्ट्र दारूबं दी कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही कारवाई सहायक पोलीस निरीक्षक मा. चंद्रकांत गोसावी साहेब यांचे मार्गदर्शनाखाली नेकनूरचे पोलीस उपनिरीक्षक आप्पासाहेब रोकडे व नवनियुक्त पोलीस उपनिरीक्षक पवनसिंग जंघाळे यांनी पोलीस अमलदार डोंगरे, बळवंत, पुंडे, क्षीरसागर, ढाकणे, शिंदे यांना सोबत घेवुन कारवाई केली. सहायक पोलीस निरीक्षक चंद्रकांत गोसावी यांच्या आदेशाने पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक पवनसिंग जंघाळे करत आहे.

# पत्नीला अर्धांगवायू झाल्याचे समजताच पतीचा हृदयविकाराने मृत्यू

सरकार नेटवर्क

गेवराई : पत्नीला अर्धांगवायू झाल्याचे समजताच पतीचा हृदयविकाराने मृत्यू झाला आहे. बीडमधल्या गेवराई तालुक्यातील या व्यक्तीचा अंबडमध्ये रविवारी मृत्यू झाला. बाजीराव रंगनाथ बंडेकर (वय ७८, रा.सेलू ता. गेवराई जि.बीड) असे मृत पतीचे नाव असून, त्यांची पत्नी सुदामती बंडेकर यांना अर्धांगवायूचा झटका आल्याने अंबड (जि. जालना) येथील एका खासगी रुग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरु आहेत. अंबड येथील मुलीकडे पत्नी असल्याने बाजीराव बंडेकर हे तेथे गेले होते. मात्र तेथे गेल्यावर त्यांना



आपल्या पत्नीला अर्धांगवायू झाल्याचे समजताच ते त्यांना भेटण्यासाठी रुग्णालयात गेले. मात्र, पत्नीची परिस्थिती पहाता रुग्णालयातून बाहेर येताच त्यांना पत्नीचे दु:ख सहन झाले नाही. बाजीराव बंडेकर यांना रुग्णालयाच्या बाहेर हृदयविकाराचा तीव्र झटका आला. त्यातच त्यांचा मृत्यू झाला. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुली, जावई असा परिवार आहे. पंचायत समितीचे माजी सदस्य स्व. शेषेराव बंडेकर यांचे ते भाऊ तर मदन बंडेकर यांचे ते चुलते होते.

# विहिरीवर पंप लावण्याच्या कारणावरून मारहाण

सरकार नेटवर्क

बीड - शेतामध्ये मोटार लावण्याच्या कारणावरून एकाला कुदळीचा तुंबा मारून जखमी केले. ही घटना अंबाजोगाई तालुक्यात १५ नोव्हेंबर रोजी घडली. याप्रकरणी दोघांविरोधात बर्दापूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल आहे. अंबाजोगाई तालुक्यातील बर्दापूर येथील बिभीषण रखमाजी माळवे हे शेतामधील मोटार सुरू करून विहिरीकडे जात असताना त्यांचा भाऊ तेथे आला 'तू मोटार चालू करायची नाही, आमची बारी आहे, असे त्यांना म्हणाला 'तुझी बारी संपली आहे' असे उत्तर बिभीषण यांनी देताच त्यांना कुदळीच्या टोकाने मारून जखमी केले. अन्य एकाने कुदळीच्या दांड्याने मारहाण जिवे मारण्याची धमकी दिली. याप्रकरणी पांडुरंग रखमाजी माळवे व आशां रखमाजी माळवे (दोघे रा. चंद्रापूर, ता. अंबाजोगाई) यांच्याविरुद्ध बर्दापूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल आहे. तपास पोलिस हवालदार येवले करीत आहेत.

# बीडमध्ये हेरीटेज वॉक उत्साहात संपन्न

सरकार नेटवर्क

बीड - सहाय्यक संचालक पुरातत्व विभाग, छत्रपती संभाजीनगर इतिहास संकलन संस्था देवगिरी प्रांत व सौ.केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर उर्फ काकू कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय बीड आणि श्याम गदळे कला व विज्ञान महाविद्यालय,दहिफळ (वडमाऊली) ता.केज जि.बीड यांच्या संयुक्त विद्यमाने जागतीक वारसा सप्ताह निमित्त दिनांक २३ नोव्हेंबर २०२४ रोजी बीड येथील कंकालेश्वर मंदीर येथे हेरीटेज वॉकचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी पुरातत्व विभाग,छत्रपती संभाजीनगर येथील डॉ.कामाजी डक सर यांची प्रमुख उपस्थिती होती.त्याचबरोबर इतिहास संकलन संस्था देवगिरी प्रांतच्या महिला विभाग प्रमुख आणि आणि श्याम गदळे कला व विज्ञान महाविद्यालय,दहिफळ (वडमाऊली) ता.केज जि.बीड इतिहास विभाग प्रमुख डॉ.शांता



जाधवर यांची प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थिती होती.सौ.केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर उर्फ काकू कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय बीड इतिहास विभाग प्रमुख डॉ.अनिता शिंदे यांची देखील उपस्थिती होती. यावेळी डॉ.कामाजी डक सर यांनी प्रास्ताविकात सांगितले की, आपला वैभवशाली वारसा सध्या नष्ट होत चालला आहे. तरी या सप्ताहाच्या निमित्ताने महाराष्ट्रातील नागरीकांनी आणि विद्यार्थ्यांनी हा वारसा जपण्यासाठी पुढे आले पाहिजे.आपल्या परिसरातील असलेला वैभवशाली ठेवा आपण जपला पाहिजे.मार्गदर्शिका डॉ.शांता जाधवर यांनी विद्यार्थ्यांना कंकालेश्वर मंदीरातील द्वार शाखा, सभामंडप, गर्भगृह,सभामंडपात कोरलेल्या मूर्त्या आणि स्तंभ याची विस्तृत माहिती दिली.त्याचबरोबर मंदीरावर असलेले दशावतार, कंकाल, मातृशक्ती आणि इतर मूर्त्यांची माहिती सांगितली. ही माहिती ऐकून अनेक विद्यार्थ्यांमध्ये कला आणि मूर्तीशास्त्र विषयाची आवड निर्माण झाली. याप्रसंगी इनटॅक छत्रपती संभाजीनगर येथील अमित देशपांडे हेही उपस्थित होते. सौ.के.एस.के. महाविद्यालयाच्या इतिहास विभागातील प्रा.संजय काळे, इतिहास संकलन संस्था देवगिरी प्रांतचे सचिव प्रा.शशिकांत पसारकर यांची यावेळी उपस्थिती होती. सौ.के.एस.के. महाविद्यालयातील एकूण एकवीस विद्यार्थी, विद्यार्थिनी या हेरीटेज वॉकमध्ये सहभाग घेतला. या उपक्रमा बद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवानंद क्षीरसागर, उपप्राचार्य डॉ. संजय पाटील देंवळाणकर, पदव्युत्तर संचालक डॉ.खान ए.एस., कमवि उपप्राचार्य डॉ.काकडे, पर्यवेक्षक जालिंदर कोळेकर यांनी अभिनंदन केले.

# भावसार समाजाच्या जिल्हाध्यक्षपदी प्रकाश कानगांवकर

सरकार नेटवर्क

बीड : बीड जिल्हा भावसार समाजाची महत्त्व पुर्ण बैठक नुकतीच श्री क्षेत्र परळी वैजनाथ येथे बीड जिल्हा भावसार समाजाच्या कार्यकारिणी संदर्भात आयोजित करण्यात आली होती. यामध्ये बीड येथील सामाजिक कार्यकर्ते सर्व सामान्य माणसाच्या सुखदु:खात सहभागी होणारे खर्या अर्थाने या पदाला न्याय देणारे प्रकाशराव कानगावकर यांची एकमताने बीड जिल्हा भावसार समाजाच्या जिल्हाध्यक्षपदी पुन्हा एकदा एकमताने निवड करण्यात आली आहे. तसेच परळी येथील गोपाळ कंकाळ यांची कार्याध्यक्ष पदी तर सचिवपदी अनिल सुत्रे, कोषाध्यक्षपदी कल्याण पतंगे यांची एकमताने निवड करण्यात आली आहे. त्यांच्या या निवडीनंतर जिल्हाभरा सह राज्य भरातुन समाज बांधवांनी अभिनंदन करत पुढिल कार्यास



शुभेच्छा दिल्या. कार्यकारिणी निवडी नंतर झालेल्या सत्कार समारंभात उत्तर देताना नवनिर्वाचित जिल्हाध्यक्ष प्रकाश कानगावकर यांनी सांगितले की, या पुढे समाजातील सर्व सामान्य माणसाला सोबत घेऊन समाजा समोरील असेलेल्या अडचणी या मध्ये प्रामुख्याने समाजातील मुला, मुलीचे विवाह, संबंधित अडचणी या साठी जिल्हास्तरीय वधू वर परिचय मेळावा आयोजित करणे, समाजातील प्रत्येक घटकाचे आर्थिक स्तर उंचविण्यासाठी शासन स्तरावर संत जनाबाई भावसार समाज आर्थिक विकास महामंडळ स्थापना संदर्भात पाठपुरावा करणे, विद्यार्थ्यांना वस्तीगृह तात्काळ उपलब्ध करुन देण्यात यावे, युवकांना उद्योग-व्यवसायासाठी शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्नशील रहाणार आहे, महिला-भगिनींसाठी देखील शासनाच्या विविध योजना व बचत गटाच्या माध्यमातून त्यांचा आर्थिक स्तर उंचाविण्यासाठी प्रयत्न करणार आहे. तसेच जिल्ह्यातील भावसार समाजाची जनगणना करणार असल्याचेही नवनिर्वाचित जिल्हाध्यक्ष प्रकाशराव कानगावकर यांनी सांगितले. तर नवनिर्वाचित कार्याध्यक्ष गोपाळ कंकाळ, सचिव अनिल सुत्रे, कोषाध्यक्ष कल्याण पतंगे, यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की समाजातील बेरोजगार युवकांना मुख्य प्रवाहात सहभागी करून त्यांचे आर्थिक जीवनमान उंचावण्यासाठी शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी विविध स्तरावर प्रयत्न करुन समाजातील युवक कसा उभा राहिल यासाठी नक्कीच प्रयत्न करु. दरम्यान उर्वरित कार्यकारिणी लवकरच जाहीर करु असे नवनिर्वाचित अध्यक्ष प्रकाशराव कानगावकर यांनी सांगितले. यावेळी झालेल्या बैठकीस ज्येष्ठ मार्गदर्शक भालचंद्र तांदळे, गोपाळराव तांदळे, बंडु गरुड, सुधर्मा सदरे, श्रीराम गुंडाळे, भाकरे, सदरे, बीड भावसार समाजाचे अध्यक्ष कैलास रंगदळ, वडवणी भावसार समाजाचे महेश सदरे, विक्रम गार्डी, मंगेश गार्डी, गोविंद सुत्रावे, भगवान पतंगे, विनोद बारटक्के, माजलगाव भावसार समाजाचे अध्यक्ष प्रदीप भावसार, सतीष गरुड, श्रीराम कळसकर, परळी भावसार समाजाचे अध्यक्ष प्रभाकरराव हजारे, उपाध्यक्ष विष्णु क्षीरसागर, युवा अध्यक्ष विलास सुत्रावे, अंबाजोगाई भावसार समाजाचे अध्यक्ष मणिष सुत्रावे, विनोद घाटे, किशोर काकडे, संतोष खेडकर, बुलबुले, बोंडगे, लखन फटाले यांच्यासह भावसार समाजाचे बीड, वडवणी, माजलगाव, परळी, अंबाजोगाई येथील अध्यक्ष, उप अध्यक्ष, सचिव सह सर्व युवक कार्यकारिणी, समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महायुतीच्या अभूतपूर्व विजयाचा अनिल जगताप यांच्याकडून जल्लोष साजरा!



सायं. दैनिक माझी सरकार
Daily Evening Majhi Sarkar

## एकनाथ शिंदे यांची मुख्यमंत्री पदावर वर्णी लागावी यासाठी शिवसैनिकांकडून साकडे

सरकार नेटवर्क

बीड : नुकत्याचा पार पडलेल्या महाराष्ट्र राज्याच्या विधानसभा निवडणुकीत मा.ना.एकनाथजी शिंदे साहेब यांच्या नेतृत्वाखाली महायुतीला मिळालेल्या अभूतपूर्व विजयी यशाबद्दल शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप यांच्या मार्गर्शनाखाली बीडमध्ये शिवसैनिकांनी महायुतीचे अभिनंदन करत मोठ्या हर्षल्हासात आनंद सोहळा साजरा केला तसेच हिंदुहृदयसम्राट मा. बाळासाहेब ठाकरे आणि धर्मवीर मा. आनंद दिघे साहेब यांच्या विचारांचा वारसा घेऊन महाराष्ट्रभरात सर्व सामन्यांसाठी कल्याणकारी योजना राबवत यशाची पताका फडकावणारे शिवसेना मुख्य नेते मा. एकनाथजी शिंदे साहेब यांची महाराष्ट्र राज्याच्या मुख्यमंत्री पदावर वर्णी लागावी यासाठी बीड शहरातील सोमेश्वर महादेव मंदिरात भावीक भक्तांच्या उपस्थितीत सामूहिक आरती करून जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांच्या समर्थकांनी साकडे देखील घातले. काल सोमवारी दि. २५ नोव्हेंबर २०२४ रोजी सायंकाळी शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेना महिला आघाडी, युवासेना पदाधिकारी लोकप्रतिनिधी शिवसैनिकांनी एकत्रित येऊन महापुरुषांना अभिवादन केले. त्यानंतर हिंदुहृदयसम्राट मा. बाळासाहेब » पान २ वर

### महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेबच असावेत : अनिलदादा जगताप

तळागाळातील माणसांची जान असणारे सर्व सामान्यांचे नेतृत्व म्हणून अवघ्या महाराष्ट्रभरातील जेष्ठ, तरुणाई, शेतकरी, कष्टकरी, महिला भगिनी यांच्यात आमचा सक्षम आधार अशी विश्वास निर्माण करणारे शिवसेना मुख्य नेते मा. ना. एकनाथजी शिंदे साहेब यांच्या नेतृत्वाखाली महायुतीने विधानसभा निवडणुकीत अभूतपूर्व यश प्राप्त केले असून आता शिंदे साहेबच महाराष्ट्र राज्याच्या मुख्यमंत्री पदासाठी सर्वोपरी योग्य चेहरा आहे व शिंदे साहेबच पुन्हा मुख्यमंत्री बनावेत अशी भावना शिवसैनिकांकडून व्यक्त करण्यात येत आहे व राज्याच्या विकासाठी शिंदे साहेबांच्याच हातात मुख्यमंत्री पदाची धुरा द्यावी अशी एक शिवसैनिक म्हणून महायुतीच्या जेष्ठ श्रेष्ठींना विनंती आहे असे शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल दादा जगताप यांनी आपली भावना व्यक्त केली.

## क्रिकेटसह कराटे स्पर्धेत 'ट्विंकलिंग स्टार'चे यश, मुला- मुलींची बाजी, सुवर्णपदके पटकावली



सरकार नेटवर्क

बीड : शहरातील ट्विंकलिंग स्टार स्कूलच्या विद्यार्थ्यांनी पुन्हा एकदा आपल्या उत्कृष्टतेचे प्रदर्शन करत क्रिकेट आणि कराटे स्पर्धेमध्ये यश मिळवत सुवर्णपदके पटकावली आहेत. १४ वर्षांखालील मुलांच्या क्रिकेट संघाने जिल्हा स्तरावरील स्पर्धेत विजेतेपद पटकावले आहे. त्याच प्रमाणे मुलींनीही कराटे स्पर्धेत बाजी मारली. श्रेया भडके (सातवी), आदिश्री गुंड कादंबरी मोरे (आठवी) यांनी तालुका स्तरावरील स्पर्धेत सुवर्णपदके जिंकून जिल्हा स्तरावर स्कूलचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळवली आहे. या विद्यार्थ्यांच्या शिक्षक अशोक » पान २ वर

## स्वस्त धान्य दुकानावरील गहू तांदूळ आम आदमी पार्टी तहसीलदारांना देणार भेट : अशोक येडे

सरकार नेटवर्क

बीड : बीड जिल्ह्यामध्ये नागरिकांना स्वस्त धान्य दुकानांमध्ये होणारे गहू तांदूळ हे निकृष्ट दर्जाचे असून ते खाणे योग्य नाहीत आम



आदमी पार्टीने पाठीमागे देखील या विषयावर आंदोलन केले होते परंतु त्यामध्ये कसलाही सुधार झालेला नाही आज अंजनवती तालुका जिल्हा बीड येथील स्वस्त धान्य दुकानावरती नागरिक धान्य घेत असताना निदर्शनास आले की हे धान्य बिलकुल खाणे योग्य नसून त्यामध्ये कचरा माती गुटक्याचे रेफर सर्व मिक्स करून गहू आणि तांदळामध्ये देण्यात येत आहे. याला जबाबदार कोण त्या मरते दोशी असणाऱ्या अधिकाऱ्यांवरती कारवाई करा हे विचारण्यासाठी हे गहू आणि तांदूळ बीड येथील पुरवठा अधिकारी व तहसीलदार यांना आम आदमी पार्टीच्या वतीने भेट देण्यात येणार आहे. व हे तांदूळ व गहू या अधिकाऱ्याने खाऊन दाखवावेत असेही त्यांना विनंती करणार आहे.

## राजमाता जिजाऊ महाविद्यालयामध्ये संविधान दिनानिमित्ताने उद्देशपत्रिकेचे सामूहिक वाचन



सरकार नेटवर्क

किल्लेधारूर : येथील मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे राजमाता जिजाऊ महाविद्यालयामध्ये २६ नोव्हेंबर भारतीय संविधान दिनानिमित्ताने प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी व विद्यार्थ्यांनी संविधानाच्या उद्देश पत्रिकेचे सामूहिक वाचन केले. राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा. नागोराव वाघमारे यांनी भारतीय संविधानाची निर्मिती व संविधानाने सर्व नागरिकांना दिलेले हक्क व अधिकार यांसंबंधी माहिती दिली. तसेच याप्रसंगी त्यांनी संविधानाच्या उद्देश पत्रिकेचे वाचन केले. याप्रसंगी प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे, उपप्राचार्य प्रा. महादेव जोगडे, उपप्राचार्य मेजर डॉ. मिलिंद गायकवाड, आयक्यूएसी समन्वयक डॉ. एल. बी. जाधवर, » पान २ वर

## आ.गोपीचंद पडळकर यांच्या विजयात शिवदास बिडगर यांचे मोठे योगदान

सरकार नेटवर्क

परळी वैजनाथ : भाजपा महायुतीचे अधिकृत जत विधानसभा मतदारसंघातील उमेदवार आ. गोपीचंद पडळकर यांच्या प्रचारार्थ पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ शासकीय स्मारक समिती सदस्य तथा धनगर समाजाचे महाराष्ट्राचे युवा नेते शिवदास बिडगर यांनी मतदारसंघातील गावोगावी बैठक व प्रचार फेरी तसेच पत्रक वाटप करत झंझावाती प्रचारफेऱ्या व गाठीभेटी देत जत मतदारसंघ पिंजून काढला होता. यानिवडणुकीत आ. गोपीचंद पडळकर मोठ्या मताधिक्याने विजयी झाले. या विजयात शिवदास बिडगर यांचा मोलाचा वाटा आहे. महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी २० तारखेला मतदान झालं, मतमोजणी झाली. राज्यातील मतदारांनी पुन्हा महायुतीलाच कौल दिला असून महायुतीचा दणदणीत विजय झाला आहे. भारतीय जनता पक्ष हा राज्यातील सर्वात मोठा पक्ष ठरला आहे. या विधानसभा निवडणुकीत जत विधानसभा मतदारसंघातून भाजपा महायुतीचे अधिकृत उमेदवार आ.गोपीचंद हिराबाई कुंडलीक पडळकर हे निवडणूक लढावली. या निवडणुकीत त्यांचा दणदणीत विजय झाला. विधानसभा निवडणुकीत आ.गोपीचंद पडळकर यांच्या प्रचारासाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ शासकीय स्मारक समिती सदस्य तथा धनगर समाजाचे महाराष्ट्राचे युवा नेते शिवदास बिडगर हे मैदानात उतरले होते. त्यांचा जत विधानसभा » पान २ वर



## ब्रम्हनाथ येळंब १३३ केव्हीएची ५ हजार केव्हीएने क्षमता वाढणार

सरकार नेटवर्क

शिरूर : शिरूर तालुक्यातील ब्रम्हनाथ येळंब येथील १३३ केव्हीए उपकेंद्रात १० हजार केव्हीए क्षमतेचे रोहित्र बसविण्यात येत आहे. यामुळे शिरूर कासार शहर व तालुक्यातील ग्रामीण भागात ५ हजार केव्हीए क्षमतेने विजेचा पुरवठा होणार आहे. यामुळे कमी दाबाने विद्युत पुरवठा, विद्युतभारनियमनच्या समस्येपासून ग्राहक, शेतकऱ्यांची सुटका होणार आहे. शिरूर शहर व तालुक्यातील ग्रामीण भागात विद्युत पुरवठ्यासाठी ब्रम्हनाथ येळंक येथे १३३ केव्हीएचे उपकेंद्र आहे. वाढती लोकसंख्या आणि शेतीग्राहकांची वाढती लोकसंख्या विचारात घेता उपकेंद्र तोकडे ठरत होते. यामुळे ग्राहकांची भारनियमन व कमी दाबाने



विद्युतपुरवठ्यामुळे मोठी गैरसोय होत आहे. कमी दाबामुळे विजेवर अवलंबून असणारे व्यवसाय अडचणीत सापडले आहेत. क्षमता कमी व वापर अधिकच्या असल्याने विद्युत पुरवठा सातत्याने खंडीत होण्याचे प्रकार होत आहेत. कमी » पान २ वर

## स्थानिक शेतकऱ्यांनी एल.टी. लाईनची तार तोडून केली गायब

## दोन दिवसात लाईन जोडा अन्यथा संघटनेच्या वतीने एमएसीबी विरोधात आंदोलन

सरकार नेटवर्क

बीड : जिल्ह्यामध्ये पाटोदा तालुका दासखेड या गावांमध्ये मधुकर माणिक शेलार यांनी दिनांक २६/१२ /२०२२ रोजी रितसर कोटेशन भरलेले आहे. व एमएसीबी कर्मचाऱ्यांनी कनेक्शन करून दिले आहे. शेलार यांच्याकडे कोटेशन,लाईट बिल, परमिशन, या सर्व गोष्टी असताना सुद्धा आज रोजी त्या गावातील मोटर धारक काही शेतकऱ्यांनी विनाकारण एल.टी. लाईनची तार तोडून गायब केली असता मधुकर शेलार यांनी कार्यकारी उपअभियंता तसेच स्थानिक लाईनमन यांच्या कानावर घालून अर्ज केला. स्थानिक लाईन मेन यांनी संगणमत करून स्थानिक शेतकऱ्यांनी तेथील तार



तोडून टाकल्या नंतर सुद्धा संबंधित अधिकाऱ्यांनी कोणती दखल घेतली नाही स्थानिक शेतकरी व महावितरणचे अधिकारी शेलार यांना जाणीवपूर्वक वारंवार त्रास देत आहेत. त्यांचे ज्वारी, गहू व इतर पीक पाण्याअभावी करपून चाललेले आहे. सदरील तेथील शेतकरी लोकांनी शेलार यांचे ४०० फुट वायर चोरून नेले आहे. व एअर वॉल मोडून टाकलेला आहे. पाईप लाईन फोडून टाकली आहे. या संदर्भाचा अर्ज पोलीस उपनिरीक्षक पोलीस स्टेशन पाटोदा व उपविभागीय जलसंधारण अधिकारी मृद व जलसंधारण उपविभागीय पाटोदा यांना आज रोजी मधुकर शेलार व ऑल इंडिया पँथर सेनेच्या वतीने आज अर्ज देण्यात आलेला आहे. दोन दिवसाच्या आत मध्ये तात्काळ या प्रकरणाला न्याय देऊन स्थानिक शेतकरी यांची लाईट जोडून देण्यात यावी अन्यथा संघटनेच्या वतीने लाईट तोडणारा स्थानिक शेतकरी व एम ए सी बी अधिकारी यांच्या विरोधामध्ये आंदोलन करून गुन्हे दाखल केले जातील याची दखल स्थानिक कर्मचाऱ्यांनी घ्यावी. आशा आशयाचे निवेदन मा.तहसीलदार साहेब तहसील कार्यालय पाटोदा यांना देण्यात आले आहे. » पान २ वर

## केजच्या बाजारात ७१०० रुपये भावाने कापूस खरेदी, कापसाची आवक वाढली



सरकार नेटवर्क

केज : दिवाळीच्या पाडव्यापासून शासकीय हमी भावाने सुरू करण्यात आलेल्या केज येथील तीन कापूस खरेदी केंद्रावर अवघ्या २० ते २२ दिवसात १०७३९ क्विंटल कापूस खरेदी करण्यात आला आहे. तर प्रति क्विंटल ७ हजार शंभर रुपयांपर्यंत भावाने कापूस खरेदी केला आहे. केज तालुक्यातील बहुतांश शेतकरी वर्ग कमी कालावधीत व दोन पिके घेता येत असल्याने सोयाबीन पिकाकडे वळला असल्याने खरीप हंगामात ८० टक्के क्षेत्र हे सोयाबीन पिकाने व्यापले जात आहे. परिणामी, दरवर्षी कपाशीचे क्षेत्र घटते आहे. दोन वर्षांपूर्वी ५ हजार हेक्टरपर्यंत असलेले कपाशीचे क्षेत्र हे यंदा जवळपास २ हेक्टरवर येऊन ठेपले आहे. त्यामुळे कापूस उत्पादनात तालुका आता मागे पडला आहे. तर कापूस वेचण्या सुरू झाल्यानंतर पणन महासंघाच्या सूचनेनुसार केज येथील » पान २ वर

हे पत्र मालक मुद्रांक, प्रकाशक, संपादक शेख फारुक शेख हमीद यांनी आर एम प्रिंटर्स, बार्शी रोड बीड -४३११२२ येथे छापून सा. माझी सरकार कार्यालय घर क्र. ३-३-१७६, आशोक नगर ढगे कॉलनी बीड, ता. जि. बीड (महाराष्ट्र) - ४३११२२ येथे प्रकाशित केले. भ्रमणध्वनी : ९४२३३०९३०२. majhisarkar2023@gmail.com (या अंकामधील प्रत्येक बातमी व लेखास संपादक सहमत असतीलच असे नाही, सर्व वाद बीड न्यायालय अंतर्गत)

Daily Evening Majhi Sarkar News paper Owenr, Printer Publisher, Editor Shaikh Farooq Shaikh Hamid Has printed At R.m Offset Barshi Road, Beed. Dist. Beed (Maharashtra 431122) and Published At Daily Majhi Sarkar, Hous No, 3-3-176, Ashok Nagar, Dhage Colony Beed. tq.Dist.Beed Maharashtra 431122 Mob- 9423309302, Epaper : majhisarkar.com, Email : majhisarkar2023@gmail.com